| पुणे जिल्हा परिषद - Process Mapping - Template | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **विभागाचे नाव :- कृषि विभाग** | | | | | |
| अ.क्र | प्रक्रिया स्थिती (Stages of Process Mapping | बाब | | माहिती | शेरा |
| PC1 | प्रक्रिया ओळख व वर्गीकरण (Process Identification and | प्रक्रिया नाव | | 75 % अनुदानावर शेतक-यांना सुधारित अवजारे व साहित्य पुरवठा करणे. (डिबीटी व्दारे) | |
| PC2 | | कार्यासन संकेतांक (उदा.आस्था1 लेखा 4) | | तांत्रिक - 6, जिल्हा परिषद निधी | |
| PP1 | प्रक्रिया प्रस्तावित करणे (Process Proposal) | प्रक्रिया प्रस्तावित करणाऱ्या अधिकारी/ कर्मचारी (maker) - पदनाम | | वरिष्ठ सहाय्यक | |
| PP2 | | संदर्भिय कायदा, नियम मॅन्युअल, अधिसूचना, शासन निर्णय, परिपत्रक, न्यायालय निकाल, शासन पुस्तके, पत्रे इत्यादी क्रमांकासह शिर्षक नमुद करावे | | 1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 नुसार मा. जि.प. सर्वसाधारण सभा व कृषि समिती सभा योजनेच्या अंमलबजावणीस व अटी शर्तीस मान्यता देते.<br><br>2) ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई -32 यांचेकडील शासन निर्णय क्र. झेडपीए-2016/ प्र.क्र.56/ वित्त-9 , दिनांक 07/10/2017 नुसार योजनेची अंमलबजावणी केली जाते.<br><br>3) नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. डिसिटी / 2316 / प्र.क्र.133 / का. 1417 मुंबई-32, दिनांक 5/12/2016 अन्वये डीबीटी धोरणानुसार औजारांचा पुरवठा हा वस्तूस्वरुपात करण्याऐवजी खरेदी समितीने निश्चित केलेल्या सदर औजाराच्या मूल्याच्या 75 % इतकी रोख रक्कम / अनुदान लाभार्थ्यांच्या बँक खात्यात रोख स्वरुपात जमा करण्याची कार्यवाही करणेत येते. | |
| | | प्रस्तावासोबत (आवश्यक असल्यास) जोडावयाची कागदपत्रे उदा.विहित नमुन्यातील अर्ज, खरेदीचे बिल, आधार कार्ड आदी | लाभार्थी/ व्यक्तींची वैयक्तिक कागदपत्रे | 1) विहीत नमुन्यातील अर्जानुसार संबंधित शेतक-याने आवश्यक कागदपत्रे जसे की 7/12 उतारा, 8अ उतारा (धारण क्षेत्र जास्तीत जास्त 10 एकर पर्यंत ), आधार कार्ड/ओळखपत्र, खरेदी करावयाच्या यंत्र/औजारे परिक्षण केल्याचा पुरावा यांच्या स्वयंसाक्षांकित प्रत, लाभार्थ्याने आधार कार्ड बँक खात्यास जोडणे आवश्यक राहील.<br>2) योजनेंतर्गत 75 % अनुदानावर 3 एच.पी.ओपनवेल विदयुत मोटार पंपसंच, 5 एच.पी. ओपनवेल विदयुत मोटार पंपसंच, 7.5 एच.पी. ओपनवेल विदयुत मोटार पंपसंच, 5 एच.पी. डिझेल इंजिन पंपसंच, 2 एच.पी. इलेक्ट्रीक कडबाकुट्टी यंत्र मोटारसह (हॉरिझेंटल मॉडेल), प्लॅस्टिक क्रेटस, प्लॅस्टिक ताडपत्री, 2.5 इंची पी.व्ही.सी.पाईप, 3.0 इंची पी.व्ही.सी.पाईप, 3.2 kg/cm2 एच.डी.पी.ई.पाईप क्लीपसह किंवा क्लीपविरहीत, ट्रॅक्टरचलित दोन फाळी सरीरिजर, बॅटरी ऑपरेटेड नॅपसॅक स्प्रेपंप, हॉरिझेंटल ट्रिपल पिस्टन स्प्रेपंप ऑईल इंजिनसह या बाबींपैकी डीबीटी धोरणानुसार लाभार्थीने एक औजाराची निवड करावी.<br>3) सदर योजनेतंर्गत पी.व्ही.सी. व एच.डी.पी.ई. पाईपचा लाभ प्रती लाभार्थ्यास जास्तीत जास्त 20 पाईप (120 मिटर) व प्लस्टिक क्रेटस् 20 किलो क्षमता या बाबीचा लाभ प्रती लाभार्थ्यास जास्तीत जास्त 30 क्रेटस् साठी देण्यात येईल. विदयुत मोटार पंपसंचाचा लाभ देताना लाभार्थीच्या 7/12 उताऱ्यावर सिंचन सुविधेची नोंद तसेच विजेची सोय असलेबाबत अश्वशक्तीनुसार लाईट बीलाची छायांकीत प्रत पुरावा म्हणुन देण्यात यावी. तसेच कडबाकुट्टी यंत्र या बाबीसाठी विजेची सोय असलेबाबत लाईट बिलाची (सिंगल फेज) साक्षांकित प्रत पुरावा म्हणून देण्यात यावी. | |
| | | | कार्यालयीन कागदपत्रे | 1) जिल्हा परिषद निधी अंतर्गत अंदाजपत्रक तरतुद पत्र.<br>2) कृषि समिती सभेची योजनेच्या अंमलबजावणीस व अटी-शर्तीस मान्यता.<br><br>3) योजनेस प्राप्त तरतुदीनुसार मा.जि.प. सर्वसाधारण सभा/ मा.स्थायी समिती सभा/ विषय समिती सभा/ अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी/ खातेप्रमुख यांची आवश्यकतेनुसार प्रशासकीय मान्यता आदेश.<br><br>4) योजनेस प्राप्त तरतुदीनुसार र.रु.50.00 लक्षच्या वरील निधीस मा.जि.प. सर्वसाधारण सभा व र.रु.10.01 ते 50.00 लक्ष पर्यंतच्या निधीस अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी व र.र. 10.00 लक्ष पर्यंत खातेप्रमुख यांची आवश्यकतेनुसार तांत्रिक मान्यता आदेश.<br><br>5) लाभार्थी शेतक-यांनी औजारे/साहित्य खरेदी अधिकृत विक्रेत्याकडून रोखीने अथवा कॅशलेस पध्दतीने करावयाची आहे.<br>6) प्रती लाभार्थीस औजारे/ साहित्य खरेदी किंमतीच्या 75 % मर्यादेत अनुदान देय राहील.<br><br>7) कृषि समिती सभेने निश्चित करुन दिलेले उदिष्ट व अंतिम लाभार्थी निवड यादी<br><br>8) लाभार्थीने औजारे/साहित्य खरेदी केल्याबाबतचे सर्व करांसहीत बिल सादर करणे. | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | 9) तालुकास्तरीय कृषि अधिकारी/ विस्तार अधिकारी (कृषि) यांनी लाभार्थींनी खरेदी केलेल्या औजारे/साहित्याची भौतिक तपासणी करणे.<br>10) तालुकानिहाय उद्दिष्टानुसार औजारे अनुदान वर्ग करणे.<br>11) संबंधित लाभार्थ्याच्या बँक खात्यात अनुदान वर्ग केलेबाबतचा आदेश. | |
| PP4 | | प्रक्रिया पुर्ण करण्यासाठी आवश्यक उपक्रम, कामाचे वार्षिक नियोजन, परिक्षा, मेळावे, कागदपत्र तपासणी कॅम्प, विशेष मोहिमा, प्रचार प्रसिध्दी | डीबीटी धोरणानुसार योजना राबविणेत येत असल्याने वर्तमानपत्रामध्ये जाहिर निवेदन प्रसिध्द केले जाऊन पंचायत समिती स्तरावर इच्छुक लाभार्थी अर्ज जमा करतात. योजनेंतर्गत उपलब्ध अनुदानानुसार तालुकानिहाय उद्दिष्ट व लाभार्थी निवड यादीस कृषि समिती सभा मान्यता देते. | |
| PP5 | | प्रक्रिया प्रस्तावित करताना जिल्हा परिषद विभाग/ पस/ग्रापं/जि.प. कडील अन्य क्षेत्रीय कार्यालये शासनाच्या विभाग/ उपक्रम/ मंडळे/ महामंडळे/ मनपा/नपा/ कटकमंडळे/ खाजगी संस्था यांचेकडुन प्राप्त करावयाची माहिती, मान्यता, शिफारस. | योजनेच्या अटी व शर्तीनुसार 1) 7/12 व 8 अ तलाठयाकडील उतारा , आधारकार्ड<br>2) ज्या औजारांसाठी लाईट बिल आवश्यक आहे त्यानुसार लाभार्थ्याकडुन लाईटबिल उपलब्ध करुन घेणे<br><br>3) पंचायत समिती स्तरावरील कृषि अधिकारी/ विस्तार अधिकारी (कृषि) व गट विकास अधिकारी/ सहाय्यक गट विकास अधिकारी यांची कागदपत्रे छाननी अंती लाभार्थी शिफारस, कृषि अधिकारी/ विस्तार अधिकारी (कृषि) यांचा फोटोसह क्षेत्रीय पहाणी अहवाल, साहित्य खरेदी पावती अन्वये अनुदान अदा करणेस मान्यता देणेत येते. | |
| PP6 | | तपासणी अधिकारी स्तर पदनाम (Checker) (स.प्र.अ./क.प्र.अ. / पर्यवेक्षीय अधिकारी) | कृषि अधिकारी व जिल्हा कृषि अधिकारी (सर्वसाधारण) | |
| PP7 | | प्रक्रिया मंजुरी देताना पडताळुन पहावयाच्या बाबी | 1) योजनेंतर्गत निश्चित केलेल्या अटी व शर्तीनुसार लाभार्थी हा शेतकरी असल्याची 7/12 उतारा व 8 अ उतारा  नुसार खातरजमा करण्यात येत.<br>2) विदयुत मोटार पंपसंचाचा लाभ देताना लाभार्थीच्या 7/12 उताऱ्यावर सिंचन सुविधेची नोंद तसेच विजेची सोय असलेबाबत अश्वशक्तीनुसार लाईट बीलाची  पडताळणी करण्यात येते.<br>3) कडबाकुट्टी यंत्राचा लाभ देताना लाभार्थ्याकडे विजेची सोय असलेबाबत लाईट बिलाची (सिंगल फेज) पडताळणी करण्यात येते.<br>4) औजारे/साहित्याचा लाभ देत असताना आधारकार्ड, संमतीपत्र, आधार कार्ड बँक खात्यास लिंक केल्याची पडताळणी करण्यात येते. | |
| PA1 | प्रक्रिया मंजुरी (Process approval) | मान्यता अधिकारी स्तर पदनाम (खातेप्रमुख/ इतर) | कृषि विकास अधिकारी | |
| PA2 | | यादी/ आराखडा मान्यता अधिकार समितीस असल्यास, समिती नाव | कृषि समिती सभा | |
| PA3 | | Endorsement(समर्थन) अधिकारी स्तर पदनाम (मुकाअ/ अति मुकाअ/ संबंधित खातेप्रमुख) | अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी | |
| PM1 | प्रक्रिया त्रुटी शोध (Process Mapping) | मंजुरी प्रक्रियेमध्ये सातत्याने आढळणाऱ्या त्रुटी | - | |
| PI1 | प्रक्रिया सुधारणा(Process improvization) | अचुकता वेळेची बचत, मनुष्यबळ कार्यक्षम वापर, पारदर्शकता याकरीता माहिती तंत्रज्ञानाचा व संगणक आज्ञावली वापर करता येण्याजोगा उपप्रक्रिया/ बाबी | संगणक प्रणालीचा योग्यप्रकारे वापर. | |
| PI2 | | तांत्रिक (Technical) ज्ञान कमी पडत असल्यास प्रशिक्षण स्वरुप, अभ्यासक्रम | - | |
| PI3 | | मुळ संकल्पना, उद्देश, लेखा संहिता, प्राधिकरण यांचे अधिकार यास धक्का न लावता प्रक्रिया सुधारणे करिता शासन स्तरावर प्रस्तावित करावयाच्या बाबी | - | |